# Shri Tilok Jain Dnyan Prasarak Mandal's

# Shri Anand College, Pathardi, Ahmednagar

## Policy Document on Environment and Energy Usage



# Policy Document on Environment and Energy Usage

Shri Anand College Pathardi focuses on energy usage in such a way that it has a minimal environmental impact. The policy applies to all the staff and students of the college. The activities being conducted in the college concern about environment. The college, in collaboration with the NSS unit, is committed to raising environmental awareness, reducing energy consumption, increasing green awareness, and implementing green campus initiatives. The college adopts Environment and Energy Usage policy with the following objectives:

## Policy Objectives:

- To raise awareness among students about the importance of maintaining a clean, green, and sustainable environment
- To make the optimum use of water and energy.
- To undertake tree-plantation drive.
- To use energy efficient devices on the campus.
- Proper handling of solid waste on the campus.
- To encourage the use of public transport and car-pooling for minimizing fuel consumption.
- To maintain smoke-free and tobacco-free campus.
- To restrict single-use plastics.
- To adopt methods for water conservation

## Policy

A clean and healthy environment promotes effective learning and creates a pleasant environment for students. The college aims to inculcate a motto "Clean Campus, Healthy Campus". The students, staff and governing body is aware about the cleanliness of campus.

1. To raise the Environment and Energy Usage policy awareness among all the stakeholders.
2. To compost the biodegradable wastes on the campus.
3. To make use of the 'Rain Water Harvesting' system on campus.
4. To encourage students and staff to follow 'No Vehicle Day'.
5. To make the campus free from wastes by using dust bins.
6. To maintain the plastic free campus.
7. To nurture the Flora and Fauna on the campus.
8. To maintain the campus clean by prohibiting smoking and tobacco chewing activities
9. To turn off electricity after occupancy time as a green practise for energy conservation.
10. To use LED bulbs/tubes for less consumption of energy.
11. To use 'Energy Start Rated' equipments to save energy.

This policy will be communicated to students and employees and it will be available to all stakeholders on the college website. The college will review the objectives and targets of the Environment and Energy Policy on a regular basis.

**Co-ordinator** **Principal**

**IQAC**

II पढमं णाणं तओ दया II
*Shri Tilok Jain Dnyan Prasarak Mandal's*
**SHRI ANAND COLLEGE**
Pathardi, Tal. Pathardi, Dist. Ahmednagar - 414 102
**Ph.** (02428) 222736,
**email :** anand.shristjvp@gmail.com **Web:** http://shrianandcollege.com
JAI ANAND

**Ref No.:** **Date: / / 201**

# Ecofriendly Ganesh Idol making workshop

Shri Anand College Pathardi and Shubhankaroti organization jointly arranged an "Ecofriendly Ganesh Idol making workshop" at various ZilhaParishad Schools in Pathardi.tahesil. Principal of the school, all the teachers and students warmly welcomed the organizers, Prof. Kalokhe (Physics Department), Prof. Santaram Sable (Marathi Department) and volunteers from the college.Many students participated in this interesting workshop where they learnt the art of idol making from clay. Third Year B.Sc. students from our college assisted children during this workshop. They prepared beautiful Ganesh idols. At the end of the workshop prizes were distributed for the best creative eco-friendly Ganesh Idol. The students seemed to be happy to craft their own created Ganesha idol.

Following are these schools in which workshops were organized.


**Shri Anand College, Pathardi.**

**Ecofriendly Ganesha Making Workshop**

| Sr. No | Name of School | Date of Workshop | Beneficiary number |
|---|---|---|---|
| 1 | Z. P. Prim. School, Dangewadi | 20 Aug 2022 | 31 ($1^{st}$ to $4^{th}$ ) |
| 2 | SantTukaramVidyalaya, Ghatshiras | 22 Aug 2022 | 33 ( $8^{th}$&$9^{th}$ ) |
| 3 | Z. P. Prim. School, Madhi, | 23 Aug 2022 | 275 ( $1^{st}$ to $7^{th}$ ) |
| 4 | Z. P. Prim. School, Eknathwadi | 24 Aug 2022 | ( $1^{st}$ to $7^{th}$) |
















कार्यालय






कार्यालय

II पढमं णाणं तओ दया II

Shri Tilok Jain Dnyan Prasarak Mandal's

# SHRI ANAND COLLEGE

Pathardi, Tal. Pathardi, Dist. Ahmednagar - 414 102

**Ph.** (02428) 222736,

**email :** anand.shristjvp@gmail.com **Web:** http://shrianandcollege.com

JAI ANAND

## राष्ट्रीय सेवा योजना - वृक्षरोपण अभियान
## 2022-23









लोकमत

# गर्भगिरीच्या डोंगरावर एका तासात लावली साडेअकराशे झाडे

## पाथर्डीतील श्री तिलोक जैन परिवाराचा उपक्रम : तीनशे विद्यार्थ्यांसह शिक्षक, संस्था चालकांचाही सहभाग



पाथर्डी तालुक्यातील माणिकदौंडी येथे तिलोक जैन परिवाराच्या वृक्षलागवड मोहिमेचा प्रारंभ करताना आमदार मोनिका राजळे व इतर उपस्थित होते.

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाथर्डी :** तालुक्यातील माणिकदौंडी घाटातील गर्भगिरीच्या डोंगरावर श्री तिलोक जैन परिवाराने एका तासात १ हजार १५० झाडे लावून आपला वेगळा ठसा उमटविला. झाडे लावण्याच्या या मोहिमेमध्ये ३०० महाविद्यालयीन, तसेच कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थी, ११० शिक्षक, संस्थाचालक सहभागी झाले होते.

सकाळी दहाच्या सुमारास पाथर्डी शहरातून श्री आनंद महाविद्यालय, श्री तिलोक जैन विद्यालय, आनंद कॉलेज ऑफ फार्मसीमधील ३०० विद्यार्थी माणिकदौंडी येथील गर्भगिरीच्या डोंगरावर पोहोचली. तेथे आमदार मोनिका राजळे यांच्या हस्ते मोहिमेचा प्रारंभ झाला. यावेळी माजी समाजकल्याण सभापती अर्जुनराव शिरसाट, माजी पंचायत समिती सदस्य सुनील ओहळ, माजी नगराध्यक्ष अभयराव आव्हाड, श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे खजिनदार सुरेश कुचेरिया, विश्वस्त धरमचंद गुगळे, डॉ. सचिन गांधी, चांदमल देसरडा, विजय लुणावत, माजी सभापती काकासाहेब शिंदे, शिवाजीराव मोहिते, धनगरवाडीचे सरपंच मिठू चितळे, अशोक गाडे, आदींसह परिसरातील नागरिक उपस्थित होते. झाडे लावण्यासाठी पाच विद्यार्थी व एक शिक्षक असे ५० ग्रुप करण्यात आले होते. प्रत्येक ग्रुपने किमान २५ झाडे लावावेत, असे नियोजन करण्यात आले होते. त्यानुसार ३०० विद्यार्थांनी एका तासात १ हजार १५० झाडे लावली. तेथेच वनभोजनाचा आस्वाद घेतला. मोनिका राजळे म्हणाल्या, शैक्षणिक क्षेत्राबरोबर सामाजिक उपक्रमात श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळ ही संस्था कायम अग्रेसर असते. यापूर्वीही कोरोना काळात या संस्थेने मोठे काम केले होते. आज वृक्ष लागवडीचा त्यांनी घेतलेला उपक्रम स्तुत्य असा आहे. अर्जुनराव शिरसाट यांनीही उपक्रमाचे कौतुक केले. संस्थेचे सचिव सतीश गुगळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मुक्तार शेख यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. इस्माईल शेख यांनी स्वागत केले. प्रा. सूर्यकांत काळोखे यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य डॉ. शेषराव पवार, प्राचार्य विलास भगत, माणिकदौंडीचे मुख्याध्यापक राजाराम माळी, उपमुख्याधापक विजय छाजेड, दिलावर फकीर, विजय घोडके, आदी उपस्थित होते. वनस्पती शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. जगन्नाथ बर्शिले यांनी झाडे लावण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# माणिकदौंडी घाटात गर्भगिरी डोंगरावर दीड हजार वृक्षांची लागवड

## श्री तिलोक जैन परिवाराचा आदर्शवत उपक्रम



जल भूमी राजेंद्र चव्हाण
पाथर्डी ता. प्रतिनिधी

-----------

माणिकदौंडी ता. पाथर्डी घाटातील गर्भगिरीच्या डोंगरावर श्री तिलोक जैन परिवाराने एका तासात सुमारे अकराशे पन्नास झाडांची लागवड करत अहमदनगर जिल्ह्यापुढे वृक्षारोपणात एक आदर्शवत कामगिरी केली आहे. या लागवडी दरम्यान 'झाडे लावू गड्यांनो, झाडे लावू' या गाण्यावर विद्यार्थ्यांनी नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण केली.माणिकदौंडी घाटातील गर्भगिरीच्या डोंगरावर श्री तिलोक जैन परिवाराने झाडे लावण्याच्या मोहिमेमध्ये सुमारे ३०० महाविद्यालयीन तसेच कनिष्ट महाविद्यालयीन विद्यार्थी ,११० शिक्षक व संस्थाचालक सहभागी झाले होते. रविवारी पाथर्डी शहरातून श्री आनंद महाविद्यालय ,श्री तिलोक जैन विद्यालय तसेच श्री आनंद कॉलेज ऑफ फार्मसी मधील सुमारे ३०० विद्यार्थी माणिकदौंडी येथील गर्भगिरीच्या डोंगरावर पोहोचली.त्या ठिकाणी आ. मोनिका राजळे यांचे हस्ते या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी माजी समाजकल्याण सभापती अर्जुनराव शिरसाट, माजी पंचायत समिती सदस्य सुनील ओव्हळ,माजी नगराध्यक्ष अभयराव आव्हाड,श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे खजिनदार सुरेश कुचेरिया,विश्वस्त धरमचंद गुगळे ,डॉ. सचिन गांधी ,चांदमल देसरडा,विजय लुणावत ,माजी सभापती काकासाहेब शिंदे ,शिवाजीराव मोहिते ,धनगरवाडीचे सरपंच मिठू चितळे ,अशोक गाडे आदीसह परिसरातील नागरिक उपस्थित होते.झाडे लावण्यासाठी पाच विद्यार्थी व एक शिक्षक असे सुमारे ५० ग्रूप करण्यात आले होते. प्रत्येक ग्रूपने किमान २५ झाडे लावावेत, असे नियोजन करण्यात आले होते. त्या नुसार सुमारे ३०० विद्यार्थांनी एका तासात ११५० झाडे लावली. झाडे लावल्यानंतर खड्ड्यात माती टाकून त्यावर पाणी टाकण्यात आले. त्या नंतर विद्यार्थांनी त्याच ठिकाणी वनभोजनाचा आस्वाद घेतला.कार्यक्रमास प्राचार्य डॉ. शेषराव पवार ,प्राचार्य विलास भगत,माणिकदौंडीचे मुख्याध्यापक राजाराम माळी, उपमुख्याधापक विजय छाजेड, दिलावर फकीर ,विजय घोडके आदि उपस्थित होते. वनस्पती शास्र विभागाचे प्रमुख डॉ. जगन्नाथ बर्शिले यांनी झाडे लावण्यासाठी विद्यार्थांना मार्गदर्शन केले.प्रास्ताविक संस्थेचे सचिव सतीश गुगळे ,सूत्रसंचालन डॉ मुक्तार शेख .स्वागत डॉ. इस्माईल शेख तर आभार प्रा सुर्यकांत काळोखे यांनी मानले.

शैक्षणिक क्षेत्राबरोबर सामाजिक उपक्रमात श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळ ही संस्था कायम अग्रेसर असते. कोरोना काळातही संस्थेने मोठे काम केले होते. आज वृक्ष लागवडीचा त्यांनी घेतलेला उपक्रम स्तुत्य असा आहे.संस्थेने सामाजिक उपक्रम राबवताना उपक्रमात आम्हालाही सहभागी करून घ्यावे जी मदत लागेल, ती आमच्याकडून दिली जाईल.

**आमदार – मोनिका राजळे .**

========================================

राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराजांचे सुशिष्य उपाध्याय प्रवर प.पू.प्रवीणऋषीजी महाराज हे गर्भगिरीच्या डोंगरावरून पायी भ्रमंती करीत असतांना पूर्वी या डोंगरावर घनदाट झाडी होती व आजची परिस्थिती पाहून त्यांनी श्री तिलोक जैन परिवाराने या डोंगराला पूर्वी सारखे वैभव प्राप्त करण्यासाठी डोंगर रांगावर वृक्ष लागवड करा, असा आदेश दिला. त्या नुसार आम्ही डोंगरावर झाडे लावण्याच्या उपक्रम घेतला आहे.

**सतिश गुगळे – सचिव**
**तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळ, पाथर्डी.**

दिव्यलोकप्रभाप्रतिनिधी राजेंद्र चव्हाण

# गर्भगिरीच्या डोंगरावर दीड हजार वृक्षांची लागवड

## तिलोक जैन परिवाराने अहमदनगर जिल्ह्यापुढे निर्माण केला आदर्श

पाथर्डी (प्रतिनिधी): पाथर्डी तालुक्यातील माणिकदौंडी घाटात गर्भगिरीच्या डोंगरावर श्री तिलोक जैन परिवाराने एका तासात सुमारे अकराशे पन्नास झाडांची लागवड करत अहमदनगर जिल्ह्यापुढे वृक्षारोपणात एक आदर्श निर्माण केला आहे. या लागवडी दरम्यान 'झाडे लावू गड्यांनो, झाडे लावू' या गाण्यावर विद्यार्थ्यांनी झाडे लावून नागरिकांमध्ये जनजागृती निर्माण करण्यात आली.

माणिकदौंडी घाटातील गर्भगिरीच्या डोंगरावर श्री तिलोक जैन परिवाराने एका तासात ११५० झाडे लावून आपला वेगळा ठसा उमटवला .झाडे लावण्याच्या या मोहिमेमध्ये सुमारे ३०० महाविद्यालयीन तसेच कनिष्ट महाविद्यालयीन विद्यार्थी ,११० शिक्षक व संस्थाचालक सहभागी झाले होते.'झाडे लावू गड्यांनो, चला झाडे लावू' या गाण्यावर विद्यार्थ्यांनी झाडे लावली. रविवारी पाथर्डी शहरातून श्री आनंद महाविद्यालय ,श्री तिलोक जैन विद्यालय तसेच श्री आनंद कॉलेज ऑफ फार्मसी मधील सुमारे ३०० विद्यार्थी माणिकदौंडी येथील गर्भगिरीच्या डोंगरावर पोहोचली.त्या ठिकाणी आमदार मोनिका राजळे यांचे हस्ते या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी माजी समाजकल्याण सभापती अर्जुनराव शिरसाट, माजी पंचायत समिती सदस्य सुनील ओव्हळ, माजी नगराध्यक्ष अभयराव आव्हाड, तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे खजिनदार सुरेश कुचेरिया, विश्वस्त धरमचंद गुगळे, डॉ.सचिन गांधी, चांदमल देसरडा, विजय लुणावत, माजी सभापती काकासाहेब शिंदे, शिवाजीराव मोहिते, धनगरवाडीचे सरपंच मिठू चितळे, अशोक गाडे आदीसह परिसरातील नागरिक उपस्थित होते. झाडे लावण्यासाठी पाच विद्यार्थी व एक शिक्षक असे सुमारे ५० ग्रुप करण्यात आले होते. प्रत्येक ग्रुपने किमान २५ झाडे लावावेत, असे नियोजन करण्यात आले होते. त्या नुसार सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी एका तासात ११५० झाडे लावली. झाडे लावल्यानंतर खड्ड्यात माती टाकून त्यावर पाणी टाकण्यात आले.'झाडे लावू गड्यांनो, चला झाडे लावू' या गाण्यावर विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद घेत झाडे लावली. त्या नंतर विद्यार्थीनी त्याच ठिकाणी वनभोजनाचा आस्वाद घेतला. यावेळी बोलतांना आमदार मोनिका राजळे म्हणाल्या ,शैक्षणिक क्षेत्राबरोबर सामाजिक उपक्रमात श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळ ही संस्था कायम अग्रेसर असते. या पूर्वी सुद्धा कोरोना काळात या संस्थेने मोठे काम केले होते.आज वृक्ष लागवडीचा त्यांनी घेतलेला उपक्रम स्तुत्य असा आहे.संस्था जे काही सामाजिक उपक्रम राबवीत आहेत, त्या उपक्रमात आम्हालाही सहभागी करून घ्या. जी जी मदत लागेल, ती आमच्याकडून दिली जाईल, अशी ग्वाही राजळे यांनी या वेळी दिली.या वेळी अर्जुनराव शिरसाट यांनीहि या उपक्रमाचे कौतुक करत समाजउपयोगी कामे करणाऱ्या बरोबर आम्ही कायम स्वरूपी राहू असेही ते म्हणाले. प्रास्ताविक संस्थेचे सचिव सतिश गुगळे, सूत्रसंचालन डॉ मुक्तार शेख स्वागत डॉ. इस्माईल शेख तर आभार प्रा सुर्यकांत काळोखे यांनी मानले. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. शेषराव पवार, प्राचार्य विलास भगत,माणिकदौंडीचे मुख्याध्यापक राजाराम माळी,उपमुख्याध्यापक विजय छाजेड, दिलावर फकीर, विजय घोडके आदि उपस्थित होते. वनस्पती शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. जगन्नाथ बर्शिले यांनी झाडे लावण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



II पढमं णाणं तओ दया II
Shri Tilok Jain Dnyan Prasarak Mandal's
SHRI ANAND COLLEGE
Pathardi, Tal. Pathardi, Dist. Ahmednagar - 414 102
**Ph.** (02428) 222736,
**email :** anand.shristjvp@gmail.com **Web:** http://shrianandcollege.com

# राष्ट्रीय सेवा योजना
## 2022-23

आज दिनांक ०७/०७/२०२२ रोजी श्री आनंद महाविद्यालय पाथर्डी येथे, अझादीचा अमृत महोत्सव निमित्त वन महोत्सव साजरा करण्यात आला. श्री आनंद वन वृक्ष लागवड व संवर्धन या मोहिमअंतर्गत संस्थेचे सचिव मा. सतिश लालजी गुगळे, मा. अरुण साबळे वनपरिक्षेत्र अधिकारी पाथर्डी, यांच्या हस्ते वृक्षरोपण करून कार्यक्रमाची शुरवात करण्यात आली.

मा. सतिश लालजी गुगळे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की कोरोना काळात आपण सर्वांनी ऑक्सिजन चे महत्व समजलो आहोत. वृक्ष आपणास विनामूल्य मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन उपलब्ध करून देतो. तसेच निसर्गाचे समतोल राखण्यासाठी वृक्षरोपन करणे आजच्या आधुनिक काळात अत्यंत गरजेचे आहे. या मोहिमेत सर्वांचा सहभाग असावा अशी अपेक्षा व्यक्त केली. मा. अरुण साबळे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की ०१ जुलै ते ०७ जुलै दरम्यान वन महोत्सव निमित्त वृक्षरोप बरोबर वृक्ष लागवड तसेच निसर्गाचे संवर्धन केले पाहिजे त्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी या मोहिमेत सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस बी पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की श्री आनंद वन वृक्ष लागवड व संवर्धन या मोहिमेत सहभाग होऊन जास्तीत जास्त वृक्ष लागवड तसेच निसर्गाचे संवर्धन करण्यासाठी योगदान देऊ असे आश्वासन त्यांनी

दिले. सदर कार्यक्रमास धरम शेठ गुगळे, राजेंद्र मुथा, विश्वस्त श्री तीलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळ पाथर्डी, प्रमुख अतिथी म्हणून रेंज फॉरेस्ट ऑफिसर मा. अरुण साबळे, मा. राजेंद्र अल्हाट , नारायण दराडे, प्रतस्विक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ मुक्तर शेख, आभार प्रदर्शन प्रा. डॉ. जगन्नाथ बर्शीले यान्ही तर सूत्रसंचलन प्रा. डॉ. जयश्री खेडकर यांनी केले प्रा. डॉ इस्माईल शेख यांनी कार्यक्रम यशवी करण्यासाठी प्रयत्न केले.














लोकमत

# माणिकदौंडीच्या डोंगरावर तिलोक जैन परिवार लावणार झाडे

## सतीश गुगळे : आनंद महाविद्यालयात वनमहोत्सवानिमित्त वृक्षारोपण; वृक्षसंवर्धनही करणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाथर्डी :** पर्यावरण बिघडले तर त्याचा परिणाम मानवी जीवनावर होतो. कोरोना काळात ऑक्सिजनअभावी अनेकांचे प्राण गेले. अनेकजण तडफडत होते. हे आपण उघड्या डोळ्यांनी पाहिले. त्यामुळे वृक्ष लागवड व संवर्धन करणे ही काळाची गरज आहे. यंदा श्री तिलोक जैन परिवारातर्फे माणिकदौंडी येथील डोंगरावर १ हजार ८ झाडे लावण्यात येतील. तसेच सर्व शाखेमध्ये तीन हजार झाडे लावून त्याचे संवर्धन केले जाईल, अशी माहिती श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव सतीश गुगळे यांनी दिली.



पाथर्डीतील आनंद महाविद्यालयात वृक्षारोपण करताना वनपरिक्षेत्र अधिकारी अरुण साबळे. समवेत श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव सतीश गुगळे, विश्वस्त धरमचंद गुगळे, राजेंद्र मुथा, वनपरिमंडळ अधिकारी राजेंद्र अल्हाट, प्राचार्य डॉ. शेषराव पवार उपस्थित होते.

पाथर्डी शहरातील श्री आनंद महाविद्यालयात आयोजित वन महोत्सवानिमित्तच्या कार्यक्रमात ते बोलत होते. राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी कल्याण मंडळ, वन विभाग पाथर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या आवारात १६८ वृक्ष लावण्यात आले. व्यासपीठावर वनपरिक्षेत्र अधिकारी अरुण साबळे, संस्थेचे विश्वस्त धरमचंद गुगळे, राजेंद्र मुथा, वनपरिमंडळ अधिकारी राजेंद्र अल्हाट, प्राचार्य डॉ. शेषराव पवार, आदी उपस्थित होते. गुगळे म्हणाले, राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज यांचे शिष्य प्रवीण ऋषीजी महाराज यांनी दिलेल्या आदेशानुसार आम्ही चालू वर्षीपासून तालुक्यातील माणिकदौंडी येथील डोंगरावर वृक्ष लागवड करणार आहोत. या बाबतची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाली असून, लवकरच डोंगरावर १ हजार ८ वृक्ष लागवड करून त्याचे संवर्धन करणार आहोत.

यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी अरुण साबळे, प्राचार्य डॉ. शेषराव पवार यांची भाषणे झाली. डॉ. मुक्तार शेख यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जयश्री खेडकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. इस्माईल शेख यांनी केले. डॉ. जगन्नाथ बर्शिले यांनी आभार मानले.

Hello Ahmednagar
Page No. 3 Jul 08, 2022
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# पर्यावरणाचा समतोल राखणे काळाची गरज : साबळे

**पाथर्डीः** कोरोनाच्या संकटात अनेकांना ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे आपला जीव गमवावा लागला. त्यामुळे मानवासाठी जैवविविधता टिकून ठेवणे खूप गरजेचे आहे. जागतिकीकरणातून मानवाच्या गरजा वाढत गेल्याने पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. पर्यावरणाचा समतोल राखणे ही काळाची गरज असून, त्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन पाथर्डीचे वनपरिक्षेत्र अधिकारी मेजर अरुण साबळे यांनी केले.



श्री आनंद महाविद्यालय व वन विभाग, पाथर्डी यांच्यासंयुक्त विद्यमाने आज पाथर्डी येथील आनंद महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले, यावेळी विद्यार्थ्यांना वृक्ष संवर्धन आणि पर्यावरण विषयी आयोजित मार्गदर्शन कार्यक्रमात साबळे बोलत होते. या वेळी श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव सतीश गुगळे, वन परिमंडळ अधिकारी राजेंद्र आल्हाट, संस्थेचे विश्वस्त धरमचंद गुगळे, राजेंद्र मुथ्था, प्राचार्य डॉ. शेषराव पवार, वनरक्षक पांडुरंग हंडाळ, नारायण दराडे, सुधाकर घोडके, विजय पालवे, स्वाती ढोले, वर्षा गीते, मनीषा शिरसाट, सविता रायकर, प्रा. दत्ताराम बांगर, प्रा. डॉ. इस्माईल शेख, प्रा. डॉ. संजय नरोडे, प्रा. डॉ. अनिल गंभिरे, प्रा. सूर्यकांत काळोखे उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. मुक्तार शेख यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. जयश्री खेडकर यांनी केले.प्रा. जगन्नाथ बरशिले यांनी आभार मानले.

Smart Ahmednagar

पुढारी

# पर्यावरणाचा समतोल राखणे गरजेचे

## वन परिक्षेत्र अधिकारी अरुण साबळे; आनंद महाविद्यालयामध्ये वृक्षारोपण

**पाथर्डी तालुका : पुढारी वृत्तसेवा**

कोरोना काळात मनुष्याला ऑक्सिजन विकत घेण्याची वेळ आली. हाच ऑक्सिजन वृक्षांद्वारे आपल्याला मोफत मिळतो. पण, आपल्याला त्याची किंमत नाही. जैवविविधता टिकून ठेवणे खूप गरजेचे असून, मनुष्याच्या असंख्य गरजा वाढल्याने पर्यावरणावर अतिक्रमण झाले आहे. पर्यावरणाचा समतोल राखणे ही काळाची गरज असून, त्यासाठी सर्वांनीच प्रयत्न करावेत, असे आवाहन वन परिक्षेत्र अधिकारी अरूण साबळे यांनी केले.

श्री आनंद महाविद्यालय व पाथर्डी वन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आनंद महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले. त्यावेळी



**पाथर्डी : श्री आनंद महाविद्यालयात वृक्षारोपण करताना सतीश गुगळे. समवेत वनपरिक्षेत्र अधिकारी अरुण साबळे.**(छाया : अमोल कांकरिया)

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना साबळे बोलत होते. यावेळी श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव सतीश गुगळे, वन परिमंडळ अधिकारी राजेंद्र आल्हाट, संस्थेचे विश्वस्त धरमचंद गुगळे, राजेंद्र मुथ्था, प्राचार्य डॉ. शेषराव पवार, वनरक्षक विजय पालवे, पांडुरंग हंडाळ, नारायण दराडे, सुधाकर घोडके, वर्षा गिते, मनिषा शिरसाट, सविता रायकर, उमेश कुलकर्णी, योगेश घोडके आदी उपस्थित होते.

सतीश गुगळे म्हणाले, तालुक्यातील माणिकदौंडी घाटातील गर्भगिरी डोंगराचे पूर्वीचे निसर्गाचे वैभव प्राप्त करून देण्यासाठी संत प्रवीणऋषिजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्ष लागवड आणि संवर्धन मोहीम श्री तिलक जैन ज्ञान प्रसारक मंडळाकडून राबविली जाणार आहे. या डोंगर परिसरात सुरुवातीला एक हजार आठ वृक्ष लागवड करून या मोहिमेचा प्रारंभ लवकरच होणार आहे. प्रा. दत्ताराम बांगर, प्रा. डॉ.इस्माईल शेख, प्रा.डॉ.संजय नरोडे, प्रा. डॉ. अनिल गंभीरे, प्रा.सूर्यकांत काळोखे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा.मुक्तार शेख, सूत्रसंचालन प्रा.जयश्री खेडकर यांनी केले. आभार प्रा.जगन्नाथ बरशीले यांनी मानले.

My Ahmednagar Edition
Jul 11, 2022 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# श्री आनंद महाविद्यालयात महावृक्षारोपण कार्यक्रम सोहळा उत्साहात संपन्न

पाथर्डी (हिंदूसम्राट प्रतिनिधी वजीर शेख यांजकडून):- पर्यावरण बिघडले तर त्याचा परिणाम मानवी जीवनावर होतो.कोरोना काळात ऑक्सिजन अभावी अनेकांचे प्राण गेले अनेक जन तडफडत होते हे आपण उघड्या डोळ्यांनी पाहीले आहे. त्या मुळे वृक्ष लागवड व संवर्धन करणे हि काळाची गरज आहे.चालू वर्षी श्री तिलोक जैन परिवारातर्फे माणिकदौंडी येथील डोंगरावर झाडे लावण्यात येतील तसेच सर्व शाखेमध्ये सुमारे तीन हजार झाडे लावण्यात येवून त्याचे संवर्धन केले जाईल असे मत श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे सचिव सतीश गुगळे यांनी व्यक्त केले.श्री आनंद महाविद्यालयात आयोजित वन महोत्सवा निमित्त राष्ट्रीय सेवा



योजना,विद्यार्थी कल्याण मंडळ व वनविभाग पाथर्डी यांचे संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या आवारात वृक्ष लावण्यात आले या वेळी झालेल्या कार्यक्रमात गुगळे बोलत होते.या वेळी व्यासपीठावर वनपरिक्षेत्र अधिकारी अरुण साबळे ,संस्थेचे विश्वस्त धरमचंद गुगळे,राजेंद्र मुथा,वनपरिमंडळ अधिकारी राजेंद्र अल्हाट,प्राचार्य डॉ शेषराव पवार आदि उपस्थित होते.गुगळे म्हणाले,राष्ट्रसंत आनंद षीजी महाराज यांचे शिष्य प्रवीण षीजी महाराज यांनी दिलेल्या आदेशानुसार आम्ही चालू वर्षीपासून तालुक्यातील माणिकदौंडी येथील डोंगरावर वृक्ष लागवड करणार आहोत या बाबतची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाली असून लवकरच डोंगरावर वृक्ष लागवड करून त्याचे संवर्धन करणार आहोत.तसेच दरवर्षी डोंगरावर वृक्ष लागवड करणार असून लाखोंच्या संखेने वृक्ष लागवड करणार असून संपूर्ण डोंगर हिरवेगार करण्याचा आमचा मानस आहे पुढच्या पिढीसाठी काहीतरी चांगले काम करण्याचा आमचा प्रयत्न आहे यासाठी सामुहिक प्रयत्न केले जातील या मोहिमेत सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन गुगळे यांनी केले.या वेळी वनपरिक्षेत्र अधिकारी अरुण साबळे,प्राचार्य डॉ शेषराव पवार यांची भाषणे झाली.प्रास्ताविक डॉ मुक्तार शेख,सूत्रसंचालन डॉ जयश्री खेडकर ,स्वागत डॉ इस्माईल शेख तर आभार डॉ जगन्नाथ बर्शिले यांनी मानले.



॥ पढमं णाणं तओ दया ॥

श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे

# श्री आनंद कॉलेज,पाथर्डी

ता.पाथर्डी,जि.अ.नगर

श्री आनंदवन वृक्ष लागवड व संवर्धन या मोहिमे अंर्तगत

राष्ट्रीय सेवा योजना,विद्यार्थी कल्याण मंडळ व
वनव्यवस्थापन समिती,वनविभाग पाथर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने

## आझादीचा अमृतमहोत्सव निमित्त वन महोत्सव कार्यक्रम

# महावृक्षारोपण

**प्रा.डॉ.जे.डी.बरशिले**
विद्यार्थी विकास अधिकारी

**प्रा.डॉ.एम.एफ.शेख**
राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी

**डॉ.एस.बी.पवार**
प्राचार्य श्री आनंद कॉलेज पाथर्डी